# मेळघाट परिसराच्या विकासासाठी पूर्ण प्रयत्न करणार





## उद्योग मंत्री उदय सामंत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.13)** - मेळघाट परिसराच्या विकासासाठी वाव आहे. राज्य शासनाकडून यासाठी पूर्ण सहकार्य करण्यात येत आहे. शासनाच्या योजना या भागात प्रभावीपणे राबवून मेळघाट परिसराच्या विकासासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मेळघाट परिसरातील 707 कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन आज धारणी येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, आमदार राजकुमार पटेल आदी उपस्थित होते. सामंत म्हणाले, मेळघाट परिसराच्या विकासासाठी सर्व लोकप्रतिनिधी आग्रही आहेत. या भागाचा विकास व्हावा यासाठी आमदार पटेल यांनी सुचविलेले कामे करण्यात येत आहे. तसेच आवश्यक असलेल्या विकास कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच विकास कामे करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. या परिसराला एक संवेदनशील व्यक्तिमत्व नेतृत्व लाभले असल्याने या भागाचा कायापालट करण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. असेही ते म्हणाले. यावेळी अडसूळ यांनी अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी कार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात आमदार राजकुमार पटेल, बाजार समितीचे सभापती रोहित पटेल यांनी मार्गदर्शन केले. तसेच अंगणवाडी सेविका, पोलिस पाटिल, रोजगार सेवक आणि लाडकी बहिण लाभार्थीचा सत्कार करण्यात आला.





### मेळघाटचे चित्र बदलणार

जाधव यांनी, महिला शेतकरी आणि सर्व घटकांसाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येत आहे. गेल्या अडीच वर्षाच्या काळात या परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहे. यात लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच मुलींसाठी मोफत शिक्षण, महिलांना अर्ध्या तिकिटात एसटीचा प्रवास यासह आशा सेविका, पोलीस पाटील यांचे मानधन वाढविण्यात आले आहे. बचत गट आणि मातृत्व योजनेतून महिलांना सहकार्य करण्यात आले आहे. शेतकरी सन्मान योजनेतून दरवर्षाला 12 हजार रुपयांची मदत देण्यात येत आहे. तसेच पिक विम्याची रक्कम वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना फायदा होत आहे. येत्या काळात सर्व ठिकाणी आरोग्य सुविधा, रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याने या भागाचे चित्र बदलणार आहे.

# विहिगावातून बोळवण आणून उठविला मुऱ्हाच्या एकविरेचा घट

## शतकापासून चालत आलेली दसऱ्याच्या दिवशीची परंपरा





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.13)** -तालुक्यातील मुऱ्हा एकविरा देवीचे देवस्थान तालुक्यातच नव्हे तर संपुर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. नवरात्रीमध्ये नऊ दिवस तालुक्यातील भक्त पायदळवारी करून दर्शन घेण्यासाठी येतात. नवरात्रीचे नऊ दिवस उत्सव उत्साहाने साजरा केला जातो आणि नवमी ला महाप्रसादचा कार्यक्रम असतो. तर दसऱ्याच्या दिवशी विहिगाव येथुन मुऱ्हा एकविरा देवीला बोळवण आणुन घट उठविण्याची प्रथा शतकापासून चालत आलेली आहे, जी परंपरा आजही कायम आहे. या दसऱ्यालाही ही प्रथा पार पाडण्यात आली.

विहिगाव येथील जुने जाणकार सांगतात की, मुऱ्हा एकविरा देवी विहिगाव या गावाची लेकबाय तर चिंचोली हे मामकुळ आहे. विहिगाव येथील भांबुरकर, काळे, भोरकडे, राऊत या वतनदारांना प्रत्येक वर्षी एकाला बोळवण नेण्याचा मान दिला जातो. वाजत-गाजत मुऱ्हा गावात बोळवण पोचल्यानंतर नागरिक आदराने त्यांचे स्वागत करतात. ही परंपरा शतकापासून चालत आलेली आहे, असे म्हटल्या जात आहे. संपुर्ण विधी संपल्यानंतर परत विहीगाव येथे परत आल्यानंतर पूर्ण गावामध्ये असलेल्या देवतांची पुजा करतात. विशेष म्हणजे एकाच दिवशी पूर्ण गावात सर्व देवी, देवतांच्या मंदिरात नारळ फोडल्या जाते.

### विविध रुपे धारण करुन नृत्याविष्कार

12 ऑक्टोबरला दसऱ्याच्या दिवशी विहिगाव येथील लक्ष्मी आई देवस्थान मधून मुऱ्हा एकविरा देवी येथे भव्य पालखीचे आयोजन करण्याच आले होते. या प्रसंगी लहान बालिकांनी विविध देवीचे रुप धारण केले होते. बालिकानी विविध रुपात आपले नृत्य सादर केले. या पालखीमध्ये बहुसंख्यने भविकभक्त सहभागी झाले होते.

# नळातून टपकला नारु?



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.13)**- तालुक्यातील अंबाडा ग्रामपंचायत मार्फत होत असलेल्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत नारू सापडल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराचा व्हिडीओ समाज माध्यमांवर 5 ऑक्टोबरला रोजी व्हायरल झाला आहे. ही घटना 5 ऑक्टोबर रोजी वार्ड क्रमांक सहा मध्ये उघडकीस आली. या प्रकारामध्ये गावकऱ्यांध्ये भीतीचे वातावरण आहे.अंबाडा येथील वार्ड क्रमांक 6 मध्ये राहणारे मोहन वन्नरकर यांचे घरी सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या नळातून नारू सापडल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर 5 ऑक्टोबरला व्हायरल झाला. परंतु पुढे प्राथमिक स्वास्थ्य केंद्राकडे किंवा अन्य शासकीय यंत्रणेकडे तपासणी करिता पाठविल्याची माहिती मिळवू शकली नाही. गावात अनेक ठिकाणी नळ गळती होत असून अशा ठिकाणावरूनही असा कृमी सदृश्य नारू पाईप मध्ये शिरु शकतो. शासनाकडून वारंवार पाणी गाळून प्यावे असा संदेश दिला जात असला तरी अंबाडा गावात या घटनेमुळे पिण्याचे पाण्याच्या सार्वजनिक पुरवठा योजनेवर संभ्रम निर्माण झाला आहे. शासकीय यंत्रणेने ताबडतोब जनतेच्या मनात असलेला संभ्रम दूर करण्यासाठी कार्यवाही करून जनतेला शुद्ध पेयजल पुरवठा करण्याचे आश्वासित करण्याची गरज आहे.

# अचलपूर मतदारसंघात काँग्रेसला धक्का

- काँग्रेसच्या अल्पसंख्याक शहराध्यक्षाचा राजीनामा
- सेवादल शहरअध्यक्षांनीही सोडली काँग्रेस

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि.13)**- येथील अल्पसंख्याक काँग्रेस शहर अध्यक्ष नईम खान युसूफ खान आणि काँग्रेस सेवादल शहर अध्यक्ष शेख कादिर पहलवान शेख महबूब यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिला आहे. ज्यामूळे ऐन विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

दोन्ही पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसवर आरोप केला आहे की, पक्ष फक्त अल्पसंख्याक मतांच्या राजकारणातच गुंतलेला आहे, परंतु जबाबदारी देण्याच्या किंवा काम करण्याच्या बाबतीत त्यांच्या विनंत्यांकडे दुर्लक्ष केले जाते. नईम खान आणि शेख कादिर यांनी सांगितले की, त्यांनी अनेकदा खासदार बळवंत वानखडे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना शहरातील समस्या आणि विकासकामांच्या बाबतीत लक्ष घालण्याची विनंती केली होती, परंतु त्यांच्या समस्यांचे निराकरण





झाले नाही. शेख कादिर पहलवान यांनी आपली नाराजी व्यक्त करत सांगितले की, वारंवार विनंती करूनही काँग्रेसच्या वरिष्ठांनी आणि स्थानिक नेत्यांनी आमच्या मागण्यांकडे लक्ष दिले नाही. या प्रकारावर नाराज होऊन दोन्ही पदाधिकाऱ्यांनी राजीनामा देत काँग्रेसपासून फारकत घेतली. मतांच्या विभाजणाला या प्रकारामूळे चालना मिळू शकते, ज्याचा फटका काँग्रेसला निवडणुकीत बसू शकतो.



# मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात एकाला अटक

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.13)** - गाडगेनगर पोलिसांनी मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात एका आरोपीला रविवारी अटक केली. सतीष सुरेश ठाकुर (40, रा. गांधी नगर, जुनी वस्ती, बडनेरा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 14 हजार रुपये किमंतीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. पंकज राजेंद्र दुलाणी (26, रा. पत्रकार कॉलनी,) यांनी मोबाईल चोरीची तक्रार गाडगेनगर ठाण्यात दिली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला. पोलिस चौकशीनंतर गोपनीय माहीतीच्या आधारे पोलिसांनी सतीष ठाकुर बडनेरातून ताब्यात घेतले. चौकशीनंतर त्याने मोबाईल फोन चोरल्याचे कबुल केले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त अरुण पाटील व पोलिस निरीक्षक प्रशांत माने यांचे मार्गदर्शनाखाली गाडगेनगर डि.बी. प्रमुख एपीआय मनोज मानकर, पोलिस हवालदार भारत वानखडे, संजय इंगळे, गुलरेज खान, जयसेन वानखडे, नंदकिशोर करोची, महेश शर्मा यांनी केली.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अरुणा फरकाडे



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.13)**- तालुक्यांतर्गत बेनोडा शहीद येथील सक्षम महिला म्हणून अरुणा फरकाडे यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी एक मताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे बेनोडा शहीद येथील नागरिकांनी अभिनंदन केले आहे. यामध्ये श्रीधर सोलव, विलास पाटील, गोपाल नांदुरकर, संजय फरकाडे, प्रवीण वानखडे, पुरुषोत्तम पोटोडे, सुभाष कदम, यशवंत खडसे, लीलाधर बारस्कर, कैलास निंभोरकर यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या ओबीसी संवाद सभा नुकतीच चांगापुर (अमरावती) येथे पार पडली. सदर कार्यक्रमात प्रमुख अतिथी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सचिन राजूरकर, राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश साबळे, विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष प्रवीण वानखडे, ग्रामगीताचार्य पौर्णिमा सवई आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.


# संभ्रमः विठ्ठला... कोणता झेंडा घेऊ हाती!

## पक्षाचा पालापाचोळा, कार्यकर्त्यांच्या पोटात गोळा | पुढाऱ्यांच्या निर्णयामुळे कार्यकर्ते सैरभैर

**विलास पाटील**

**वरुड,(दि.13)** - पक्षाचे, सहज पक्षांतर, सोयीचे राजकारण, गडु प्रमाणे गोल बुडाचे पुढारी या सर्व प्रकारामूळे कार्यकर्त्यांची मोठी गोची होताना दिसत आहे. कार्यकर्ते सैरभैर झाले आहेत. कुणाचे पोस्टर लावायचे, कोणत्या नेत्यासोबत जायचे असा संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे. विठ्ठलाऽऽ. कोणता झेंडा घेवू हाती म्हणण्याची वेळ निष्ठावंत कार्यकर्त्यांवर आली आहे.

अडीच वर्षापूर्वी शिवसेनेत फूट पडली आणि त्यानंतर अवघ्या काही महिन्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेही दोन तुकडे झाले. या राजकीय भूकंपामुळे अख्खा महाराष्ट्र ढवळून निघाला. सत्तेच्या केंद्रस्थानी राहण्याच्या महत्त्वकांक्षेमधून हे प्रकार घडले.



प्रेमात, युध्दात आणि आता राजकारणात काहीही होवू शकते, शिवसेनेत दुफळी निर्माण होवून अडीच वर्ष झाल्यानंतरही आजही शिंदे व ठाकरे गटातील पुढारी केव्हातरी एक होतील या आशेवर आहेत. शिंदे, फडणवीस सरकारची वर्षपूर्ती झाल्यानंतरही आनंद साजरा करण्यात आला नाही. आता तर राष्ट्रवादीही सोबत आली आहे. कालपर्यंत एकमेकांवर चिकलफेक करून आरोपांच्या फैरी व खालच्या स्तरावर आरोप करणारे आता मांडीला मांडी लावून बसणार आहेत, त्यामुळे सध्या राजकारणच अस्थिर स्वरूपाचे झाले आहे. कोणता पुढारी कुणासोबत हेच कळेनासे झाल्याने कार्यकर्ते गोंधळात असून सैरभैर झाले आहे. आता कुणाचा झेंडा हातात आणि कुणाचा प्रचार करायचा अशी संभ्रमावस्था विधानसभा निवडणूकीच्या तोंडावर कार्यकर्त्यांची झाली आहे.

### उघड विरोध करणे अवघड जागेतलं दुखणं

गावात एखाद्या कार्यकर्त्यांकडून एखाद्या पुढाऱ्याचा उघड विरोध करणे, अवघड जागेतल्या दुखण्याप्रमाणे झाले आहे. उद्या तोच पुढारी पक्षात आला तर कार्यकर्त्यांला त्याच्या पाठीमागे उभे रहावे लागते. ज्याच्या विरोधात कालपर्यंत तोच पुढारी आज सत्तेत समाविष्ठ झाला आहे. ज्या व्यक्तीविरुध्द कालपर्यंत मुर्दाबादचे नारे लावले, आज त्याच्या जिंदाबादचे नारे लावावे लागत आहे. वरुड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदाराचा प्रचार करायचा की, विरोध हेच भाजप कार्यकर्त्यांना कळायला येत नाही.

### बहुपक्षीय सरकार

एका पक्षाची सत्ता होती त्यावेळी कार्यकर्त्याचा पुढारी एकच होता त्यासाठी तळमळीने काम केल्या जायचे. त्यांच्याच वाढदिवशी बॅनर पोस्टर्स लावले जायचे. त्यावेळी वेगळे वातावरण होते. आता मात्र कमालीची खिचडी झाली आहे. आता एका पोस्टर व बॅनर्समध्ये सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांचे फोटो लावावे लागत आहेत. त्यामुळे कार्यकर्त्याला एकाच कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या ठिकाणी दोन्ही गटांना राजी करावे लागत आहे. काम असेल तर कोणत्या पुढाऱ्याकडे जावे असा संभ्रम कार्यकर्त्यामध्ये आहे. राजकीय भूकंपामुळे शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते सैरभैर झाले आहेत.

# कारची दुचाकीला धडक, एक ठार एक गंभीर

## कुऱ्हा हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 13)** - कुऱ्ह्याकडून अमरावतीकडे येणार्या भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार जागीच ठार झाला, तर कारमधील एक गंभीर जखमी झाला आहे. लक्ष्मीकांत सुभाष मुंदडा (32, पिंपळखुटा (ता.धामणगाव रेल्वे) असे मृताचे नाव असून, गंभीर जखमीमध्ये सौरभ नितेश सोळंकी (रा. ओडिशा) यांचा समावेश आहे. ही घटना कुर्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीत रविवारी उघडकीस आली.

कुऱ्हापासून एक किलोमीटर अंतरावर अमरावती वळणावर अमरावतीकडे येणारी भरधाव एमएच 14 जेई 8800 या क्रमांकाच्या कारने एम एच 27 सी एफ 8113 या क्रमांकाच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर कार ही रस्त्यांच्या कडेला असणार्या दिशादर्शक फलकावर आदळून पळसाच्या झाडाजवळ जाऊन उलटली. या अपघातात दुचाकीस्वार लक्ष्मीकांत सुभाष मुंदडा हा जागीच ठार झाला, तर सौरभ नितेश सोळंकी हा गंभीर जखमी झाला. या अपघाताची माहिती मिळताच कुऱ्हा पोलीसांसह गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमीला कारमधून बाहेर काढून कुऱ्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचारासाठी नेले. त्यानंतर त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. लक्ष्मीकांत मुंदडा यांचे अमरावतीमध्ये मेडिकल असल्याची माहिती पुढे आली आहे. पुढील तपास कुऱ्हा पोलीस करीत आहे. या घटनास्थळी या पूर्वी बडनेरा येथील प्रसिद्ध वकील सोनल मख्खनलाल शर्मा यांच्या सुध्दा अपघात होऊन मृत्यू झाला होता. त्यामुळे संबंधित विभागाने या घटनास्थळीचे रूंदीकरण केल्यास, अशा अपघाताला आळा बसेल, अशी मागणी नागरिकांची आहे.